Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (MRDWP) अंमलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१६/प्र.क्र.८३/पापु-१९**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीखः २५ जानेवारी, २०१७

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०
२) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१३
३) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११३/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक २२ जानेवारी, २०१४
४) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक ०९ जुलै, २०१४
५) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४
६) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक १६ फ़ेब्रुवारी, २०१५
७) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-११११/प्र.क्र.१३४/पापु-०७, दिनांक २० फ़ेब्रुवारी, २०१५
८) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १० मार्च, २०१५
९) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून, २०१५
१०) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६
११) शासन निर्णय क्रमांक: ग्रापापु-२११५/प्र.क्र.३९/पापु-१९, दिनांक २३ सप्टेंबर, २०१६

**प्रस्तावना:-**

राज्यातील ग्रामीण भागांतील दीर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता संदर्भाधीन क्र.१० येथील दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या कालावधीत "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP)" राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयात योजनेच्या अंमलबजावणी करिता सविस्तर व विस्तृतपणे विवेचन करण्यात आलेले आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना क्षेत्रिय स्तरावर येणा-या अडचणी विचारात घेता, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सुयोग्य अंमलबजावणीकरिता संदर्भाधीन दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील काही तरतुदीचा खुलासा करणे व काही तरतुदी नव्याने समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



## शासन निर्णय:-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा प्रामुख्याने नवीन घ्यावयाच्या योजना, बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती या तीन प्रकारात राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची सुयोग्य अंमलबजावणी होण्याकरिता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

### (अ) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने घ्यावयाच्या रुपये ५.०० कोटी किंमतीपर्यंतच्या व दरडोई खर्चाच्या निकषात बसणा-या नळ पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संदर्भाधीन क्र.१० येथील दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा जलव्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहेत.

परंतु संदर्भाधीन क्र.११ येथील दि.२३ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद स्तरावरुन प्रशासकीय मान्यता द्यावयाच्या योजनांच्या तपासणीसाठी प्रधान सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठित करण्यात आली आहे. त्यामुळे अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचे अध्यक्षतेखालील समितीव्दारे व्यवहार्य ठरविलेल्या व प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखालील तांत्रीक समितीने मान्यता दिलेल्या योजनांना पुन्हा जिल्हा जलव्यवस्थापन समिती समोर प्रशासकीय मंजुरीसाठी ठेवण्यात कालापव्यय होणार असल्याने, तांत्रिक समितीने मंजुरी दिलेल्या योजनांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्तरावरुन प्रशासकीय मंजुरीची कार्यवाही करण्यात यावी.

### (ब) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन :-

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जीवित करावयाच्या प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्याचे अधिकार खालीलप्रमाणे राहतील.

| मुख्य अभियंता | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (शासन) |
|---|---|---|
| रु. ५.०० कोटी पर्यंत | रु. ५.०० कोटीहून अधिक ते रु.१०.०० कोटी पर्यंत | रु. १०.०० कोटीहून अधिक |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



## (क) कार्यक्रमांतर्गत मंजुर पाणी पुरवठा योजनांकरिता निविदा व कार्यारंभ आदेश प्रक्रिया.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने घ्यावयाच्या व पुनरुज्जीवित करावयाच्या पाणीपुरवठा योजनांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आल्यानंतर तीनही उपांगाकरिता निविदा प्रक्रिया एकत्रितपणे पुर्ण करण्यात यावी. मात्र "उपांग-१ चे काम पुर्ण झाल्यानंतर व योजनेचा उद्भव पुरेसा/शाश्वत असल्याचे सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केल्यानंतरच उपांग-२ चे काम हाती घेण्यात यावे आणि उपांग-२ चे काम पुर्ण झाल्यानंतरच उपांग-३ चे काम हाती घेण्यात यावे" अशी अट कार्यारंभ आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.

परंतू ज्या ठिकाणी नदी, धरण, तलाव इत्यादी सारखे शाश्वत भूपृष्ठीय स्रोत उपलब्ध आहेत व कायमस्वरुपी पाणी उपलब्ध आहे अशा प्रकरणी उपांग-१ व उपांग-२ ची कामे शासनाच्या पुर्वमान्यतेने एकत्रितपणे करता येतील. ज्या प्रकरणी उपांग-१ व उपांग-२ चे काम एकत्रितपणे करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणी शासनाची (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) पूर्व मान्यता घेणे अनिवार्य राहील. शासनाची पूर्व मान्यता घेतल्याशिवाय उपांग-१ व उपांग-२ चे काम एकत्रितपणे करता येणार नाही अशी स्पष्ट अट कार्यारंभ आदेशात व करारपत्रात नमूद करण्यात यावी.

## (ड) कार्यक्रमांतर्गत मंजुर पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती.

संदर्भाधीन क्र. १० येथील दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये कंत्राटदारामार्फत योजना पूर्णत्वानंतर करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये तसेच योजनेच्या भांडवली खर्चामध्ये समाविष्ट करता येणार नाही असे नमुद केले आहे. यासंदर्भात येथे स्पष्ट करण्यात येते की, नळ पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण झाल्यानंतर व योजनेव्दारे पाणी पुरवठा करण्याआधी योजनेची चाचणी (Trial Run) करण्यात येते. सदर चाचणीचा खर्च योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये पुढीलप्रमाणे समाविष्ट करता येईल.

| अ.क्र. | योजनेचा प्रकार | चाचणी (Trial Run) करिता अनुज्ञेय खर्च |
|---|---|---|
| १ | एका गावांकरिता स्वतंत्र योजना | ३ महिने योजना चालविण्याकरिता येणारा खर्च. |
| २ | २ किंवा ३ गावांकरिता प्रादेशिक योजना | ६ महिने योजना चालविण्याकरिता येणारा खर्च. |
| ३ | ३ पेक्षा जास्त गावांकरिता प्रादेशिक योजना | १ वर्ष योजना चालविण्याकरिता येणारा खर्च. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने घेण्यात येणा-या नळ पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीची संपुर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थाची आहे. त्यामुळे योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्यापूर्वी योजना पुर्णत्वानंतर योजना हस्तांतरित करुन घेणेस व योजनेचे दायित्व स्वीकारण्यास तयार असलेबाबत ग्रामपंचायतीचा (स्वतंत्र योजनेच्या बाबतीत) व जिल्हा परिषदेचा (प्रादेशिक योजनेच्या बाबतीत) ठराव घेण्यात यावा. पुर्ण झालेल्या योजना हस्तांतरीत करुन घेण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची राहणार आहे. योजना हस्तांतरीत करुन घेण्याच्या प्रक्रियेबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील.

संदर्भाधीन दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर किमान ३ वर्षे (Trial Run कालावधी वगळून) योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले आहे. योजना पुर्ण झाल्यानंतर ३ वर्षाच्या कालावधी दरम्यानचा आस्थापना, विद्युत देयके, रसायने व इतर अनुषंगिक बाबींवरील खर्च ग्रामस्थाकडून वसूल करण्यात आलेल्या पाणीपट्टी मधून भगविण्यात यावा.

कंत्राटदाराचा ३ वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर हस्तांतरित योजना स्वत: चालवायची किंवा कंत्राटी पध्दतीने चालवायची याबाबतचा निर्णय संबंधित ग्रामपंचायत/ जिल्हा परिषदेने घ्यावयाचा आहे. पाणीपुरवठा योजनेच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाचा अंदाज घेऊन त्यानुषंगाने पाणीपट्टीची आकारणी करणे व आकारलेल्या पाणीपट्टीची जास्तीत जास्त वसूली होईल यासाठी प्रयत्न करणे ही संबंधित ग्रामपंचायत/जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाना चाचणी (Trial Run) कालावधीत नळ कनेक्शन देऊन पाणीपट्टीची वसूली करावी व ती रक्कम योजनेच्या बँक खात्यात भरुन पुढील देखभाल दुरुस्तीसाठी वापरावी. पाणीपट्टी वसुली व अन्य अनुदान जमा करण्याकरिता संबंधित ग्रामपंचायत/जिल्हा परिषदेस स्वतंत्र बँक खाते तयार करण्यात यावा व त्यातून योजना चालविण्याचा खर्च भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०११८११०४२५४४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ram Apparao Sabane
Digitally signed by Ram Apparao Sabane
DN: CN = Ram Apparao Sabane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Desk Officer
Date: 2017.01.25 15:29:18 +05'30'

**(रा. अ. साबणे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१,
५) विभागीय आयुक्त (सर्व).
६) जिल्हाधिकारी (सर्व) .
७) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पी.एम.टी.बिल्डींग स्वारगेट, पुणे.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
९) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई / महाराष्ट्र २, नागपूर.
१०) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई / महाराष्ट्र २, नागपूर
११) मुख्य /अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१२) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई
१३) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद (सर्व).
१४) निवड नस्ती (पापु-१९)